Marathi letter file .

29

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
## राहुरी जि.अहमदनगर

संकेतस्थळः- w w w.mpkv.mah.nic.in
दुरध्वनी क्रमांकः-(०२४२६)२४३३७४
ई मेलः- asstt.compt.iv@gmail.com
फॅक्स नंबर :- (०२४२६)२४३२२७

---

जा.क्र.मफुकृवि/लेखा-४/४४४/२०१८, दिनांकः-२२ /०२/२०१८

## परिपत्रक

**विषय :-** DCPS योजनेतील सदस्य अधिकारी / कर्मचा-यांच्या दि. ३१.०३.२०१७ रोजीच्या शिल्लक निधीची पडताळणी करणेबाबत..

**संदर्भ:-** जा.क्र.मफुकृवि/लेखा-४/एनपीएस /३६४/२०१७.दि.२७/१२/२०१७

उपरोक्त संदर्भिय परीपत्रकान्वये नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेमध्ये समाविष्ट झालेल्या कर्मचा-यांच्या सन २०१६-१७ अखेरपर्यतच्या वार्षिक विवरणपत्रात दरमहा जमा झालेला कर्मचारी हिस्सा व शासन हिस्सा ही रक्कम बरोबर असुन त्या पोटी जमा करण्यात आलेली व्याजाची आकारणी देखील बरोबर आहे याबाबतचे हमीपत्र संबंधीत अधिकारी/कर्मचारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून मागविलेले होते.

तथापी जमा रक्कमेच्या वार्षिक विवरण पत्रात त्रुटी असल्यामुळे काही कर्मचा-यांनी या कार्यालयाकडे दुरुस्तीबाबत संपर्क केलेला आहे. उदा. वेतनातून कपात केलेल्या अंशदानाच्या रकमा गहाळ असणे, सुरवातीची शिल्लक व व्याजाची रक्कम कमी मिळणे, सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते जमा नसणे, इ. याबाबत संबंधित कर्मचारी वारंवार थेट या कार्यालयाकडे संपर्क करत आहेत. मात्र त्यांच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी विवरणपत्रे बरोबर असल्याबाबतचे हमीपत्रे भरुन दिलेली आहेत. कर्मचा-यांस मिळणा-या वार्षिक विवरणपत्रात काही त्रुटी असल्यास वेळीच दुरुस्ती करणे गरजेचे होते. तथापी आजमितीसही काही कार्यालयांकडून कर्मचा-यांच्या वार्षिक विवरण पत्रामध्ये दुरुस्ती करुन घेतलेल्या नाहीत. त्रुटीच्या दुरुस्तीसाठी विवरणपत्राची मागणी केलेल्या कर्मचा-यांना कार्यालयाकडून विवरणपत्राची साक्षांकीत प्रत उपलब्ध करुन दिली जात नाही, अशीही तक्रार आलेली आहे.

नियंत्रक
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी, जि. अहमदनगर

(हु. मा.े. पद्य.)

Marathi letter file .

या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिका-यांना पुन्हा सुचित करण्यात येते की अशा प्रकरणी संबंधित कर्मचा-यांनी नियुक्तीपासूनच्या वार्षिक विवरणपत्रात ज्या कार्यालयाकडील तफावत आहे अशा कार्यालयाकडे स्वत: अर्ज केल्यास संबंधीत कार्यालयाने कर्मचा-यांच्या अर्जानुसार कर्मचा-याचे नाव ज्या मुळ विवरणपत्रात (Schedule)असेल त्या विवरणपत्राचा यापूर्वी पाठविलेला पूर्ण संच व तेवढयाच रकमेच्या धनादेशाची नोंद असलेल्या पत्राच्या साक्षांकित प्रतीसह खाली नमुद दिनांकास आपल्या कार्यालयाचा एक प्रतिनिधी वार्षिक विवरणपत्रे दुरुस्तीसाठी या कार्यालयाकडे पाठवावा. म्हणजे सदर वार्षिक विवरणपत्रात दुरुस्ती करुन पुढील सर्व स्लिपा दुरुस्त करणे शक्य होईल.

तसेच सदर परिपत्रक आपले अधिनस्त कर्मचा-यांचे निदर्शनास आणून दयावे व प्राप्त अर्जावर खालील नमुद कालावधीमध्ये कार्यवाहीसाठी आपला प्रतिनिधी पाठवावा.

| अ.क. | विभाग | दिनांक |
|---|---|---|
| १ | पुणे | दि. १२ मार्च, २०१८ ते १४ मार्च, २०१८ |
| २ | कोल्हापूर | दि. १५ मार्च, २०१८ ते १७ मार्च, २०१८ |
| ३ | धुळे | दि. १९ मार्च, २०१८ ते २१ मार्च, २०१८ |
| ४ | राहुरी | दि. २२, २३ मार्च, २०१८ व २६ ते २८ मार्च, २०१८ |

संबंधीत नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना धारकाकडे दस्तऐवज देऊ नये. दुरुस्तीची जबाबदारी ही आहरण व संवितरण अधिकारी यांची असल्याने सदर कामास प्राधान्य दयावे. कारण अशा कर्मचा-यांचा लवकरच राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये समावेश होणार असून तदनंतर कुठल्याही प्रकारची दुरुस्ती होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**नियंत्रक**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ,**
**राहुरी.जि.अहमदनगर**

**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**

१. अधिष्ठाता (कृषि) व संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
२. संचालक, शिक्षण/संशोधन/कृषि शिक्षण विस्तार, मफुकृवि,राहुरी.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व), मफुकृवि, राहुरी.
४. विभाग प्रमुख, मफुकृवि,राहुरी (सर्व)